# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २५/०२/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### विनयभंग

**पो.स्टे. वेलतुर :–** दिनांक २३/०२/२०२२ चे २२.०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय ३५ वर्षीय ही आपले कुटूंबासह गावातील एका रिसेपशन चे कार्यक्रमात जाउन जेवन करून तिचे मोठया बहिणीसह घराकडे परत जात असता आरोपी नामे– गोलू नत्थू भोयर, वय २५ वर्ष, रा. रत्नापूर ता. कुही याने तिचे मागुन येवुन तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग करून अपमान केला. तेव्हा फिर्यादी ही ओरडली त्यामुळे फिर्यादीची बहीण हीने मध्यस्ती येवुन सोडविले. तेव्हा आरोपीने फिर्यादीस एक थापड मारली व 'तुला उदया तुझे घरून उचलून घेवून जाईन' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३२३, ५०६ भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा स्वाती लोखंडे मो.क्र. ९१४५५३५५०८ या करीत आहे.

### जबरी संभोग

**पो.स्टे. भिवापुर :–** दिनांक २२/०२/२०२२ चे १५:०० वा. चे सुमारास फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी/पीडिता वय ०७ वर्ष ०६ महिने हीला आरोपी नामे– पवन हरी हर्षे, वय २० वर्ष, रा.रोहणा ता.भिवापुर याने 'दुकानातुन खर्रा आणुन दे' असे म्हणुन त्याचे राहते घरी बोलावुन पीडिते सोबत जबरी संभोग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६ (२)(आय)(जे)(एन) भादंवि. सहकलम ३(१)(डब्लु(i)(ii)3(2)(व्ही) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९. सहकलम ४, ६, ८, १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी उमरेड विभाग उमरेड श्री भिमराव टेळे हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. सावनेर :–** अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील माळेगाव शिवार सावनेर ते नागपूर रोड राष्ट्रीय महामार्ग क्र ४७ येथे दिनांक २३/०२/२२ चे १९.४५ वा. दरम्यान राकेश प्रदिप गेडाम (मृतक), वय ३० वर्षे, धंदा नौकरी पोलिस शिपाई बनं २३६९ नेमणुक पोस्टे कळमेश्वर हे सावनेर वरून नागपुर च्या दिशेने त्यांच्या एम.एच. ३१/ईएक्स– ५४२५ क्रमांकाच्या बजाज पल्सर २२० ने जात असतांना मानेगाव शिवारातील आरिफ ढाब्यासमोर सावनेर ते नागपुर रोडवर त्यांच्या ताब्यातील मोटरसायकलचा समोरील टायर फुटल्याने त्यांचा मोटरसायकल वरील नियंत्रण सुटल्याने त्यांची मोटरसायकल रोडचे उजव्या भागाला असलेल्या डिव्हायडरला घासुन रोडवर पडली व ते डिव्हायडर मधील असलेल्या दिशा दर्शक लोखंडी ॲगल ला धडकल्याने ते गंभीर जखमी होवुन मरण पावले. मृतक पोलिस शिपाई राकेश प्रदिप गेडाम हे स्वत:च्या मरणास कारणीभुत ठरले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा कृष्णा जुनघरे पोस्टे सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री फुलेकर मो.क्र. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत ०९ कि.मी अंतरावरील जवराबोडी शिवार येथे दिनांक २४/०२/२०२२ चे ०९:३० वा. दरम्यान **सुभाश सुदान श्रीरामे (मृतक) वय ४५ वर्ष, रा. किरमंडी (मेंढा) ता. नागभिड जि. चंद्रपूर** याने पहली पत्नी व दोन मुल सोडून दुसरे लग्ण केले. तेव्हापासुन मृतक हा दुस–या पत्नी सोबत किरमंडी (मेढा) ता नागभिड जि चंद्रपूर येथे राहत होता. त्याने अज्ञात कारणातुन स्वता गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी पोलिस हवालदार राकेश त्रिपाठी, पोलीस स्टेशन भिवापुर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. भिवापुर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार किशोर ठाकुर ९०२२८५७६८२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर